# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २४/०८/२०१८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २४/८/२०१८ रोजी सभा सुचना क्र. ०६ दि. १८/०८/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. धृवकिशोर पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | मा. सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्री. व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ४. | श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश | सदस्य |
| ५. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६. | श्री. विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७. | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | सदस्य |
| ८. | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ९. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| १०. | श्रीम. दिप्ती भट्ट | सदस्या |
| ११. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १२. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १३. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. रावल मेघना दिपक | सदस्या |
| २. | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | सदस्या |
| ३. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २४/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे**. २ के खाली विषय आहे. **मरा भाईंदर महानगरपालिका शांतीनगर येथील प्रभाग क्र. ३६ (भागशः), प्रभाग क्र. ३७ (पूर्ण), प्रभाग क्र. ३८ (भागशः) मध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे. (श्री. अटलबिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना) कामाच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.** ह्या विषयाला सभागृहाची मान्यता आहे का?

**दिप्ती भट :-**

मा. सभापती महोदय तो आमचा वॉर्ड आहे आणि ते पहिले पास झाले होते. टेंडर प्रोसेसमध्ये अडकलेले तर तो विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

सभागृहाची मान्यता असल्यामुळे विषयपत्रिकेवरील सर्व विषय संपल्यावर शेवटी हा विषय घेण्यात येईल. प्रकरण क्र. ६४, **मा. आयुक्त सो. यांचेकरीता नविन वाहन खरेदी करणेबाबत.**

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त साो. यांना महानगरपालिका कार्यालयीन कामकाजाकरिता मनपा क्षेत्रातील विविध विकास कामांवर देखरेख करणे, मनपा क्षेत्रातील पदाधिकारी/नगरसेवक/नागरिक यांच्या समस्या सोडविणे, जिल्हाधिकारी ठाणे तसेच विविध शासकीय कार्यालयीन कामकाजाकरिता भेटी देणे, कार्यालयीन कामकाजाकरिता मंत्रालय, मुंबई व कोकण भवन येथे जाणे उपरोक्त ठिकाणी वेळेत पोहचणे गरजेचे असते. परंतु वाहना अभावी वेळेवर कार्यालयीन कामकाज करणे अडचणीचे होणार असल्याने वाहन उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे.

मा. आयुक्त साो. यांना यापुर्वी वाहन क्र. एमएच.०४.एएन.९०९९ (टाटा मांझा) हे वाहन वापरात होते. सदरचे वाहन २०११ मध्ये खरेदी केलेले असुन वाहनास ७ ते ८ वर्ष झालेली असुन हे वाहन नादुरूस्त होत आहे.

शासन निर्णय क्र. वाहन/२०१४/प्र.क्र.-३६/१४/विनियम दि. २२/०८/२०१४ अन्वये निर्लेखित केलेल्या वाहनांच्या एकूण संख्येच्या ७५% वाहन खरेदी करणेबाबत मान्यता आहे. महानगरपालिकेने सन २०१७-१८ या वर्षात एकूण ११ वाहने निर्लेखित केलेली आहेत. सदर शासन निर्णयानुसार निर्लेखित वाहनांच्या बदल्यात मा. आयुक्त साो. यांना नविन वाहन खरेदी करणे शक्य होईल. सन २०१८-१९ अर्थसंकल्पात **"नविन वाहन खरेदी"** या लेखाशिर्षात रू. १०.०० लाख इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी मारुती कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून मारुती सियाज (पेट्रोल) नविन वाहन शासन मर्यादेनुसार खरेदी करणे योग्य होईल सदर वाहन खरेदी करीता सन २०१८-१९ मधील अंदाजपत्रकात **नविन वाहन खरेदी या लेखाशिर्षात १०.०० लाख इतकी तरतूद** करण्यात आलेली आहे. सदर तरतुदी मधुन जेम ई मार्केटिंग पोर्टल यांचे मार्फत थेट वाहन खरेदी करणेस मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ६४ :-**

***मा. आयुक्त सो. यांचेकरीता नविन वाहन खरेदी करणेबाबत.***

**ठराव क्र. ५७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त साो. यांना महानगरपालिका कार्यालयीन कामकाजाकरिता मनपा क्षेत्रातील विविध विकास कामांवर देखरेख करणे, मनपा क्षेत्रातील पदाधिकारी/नगरसेवक/नागरिक यांच्या समस्या सोडविणे, जिल्हाधिकारी ठाणे तसेच विविध शासकीय कार्यालयीन कामकाजाकरिता भेटी देणे, कार्यालयीन कामकाजाकरिता मंत्रालय, मुंबई व कोकण भवन येथे जाणे उपरोक्त ठिकाणी वेळेत पोहचणे गरजेचे असते. परंतु वाहना अभावी वेळेवर कार्यालयीन कामकाज करणे अडचणीचे होणार असल्याने वाहन उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे.

मा. आयुक्त साो. यांना यापुर्वी वाहन क्र. एमएच.०४.एएन.९०९९ (टाटा मांझा) हे वाहन वापरात होते. सदरचे वाहन २०११ मध्ये खरेदी केलेले असुन वाहनास ७ ते ८ वर्ष झालेली असुन हे वाहन नादुरूस्त होत आहे.

शासन निर्णय क्र. वाहन/२०१४/प्र.क्र.-३६/१४/विनियम दि. २२/०८/२०१४ अन्वये निर्लेखित केलेल्या वाहनांच्या एकूण संख्येच्या ७५% वाहन खरेदी करणेबाबत मान्यता आहे. महानगरपालिकेने सन २०१७-१८ या वर्षात एकूण ११ वाहने निर्लेखित केलेली आहेत. सदर शासन निर्णयानुसार निर्लेखित वाहनांच्या बदल्यात मा. आयुक्त साो. यांना नविन वाहन खरेदी करणे शक्य होईल. सन २०१८-१९ अर्थसंकल्पात **"नविन वाहन खरेदी"** या लेखाशिर्षात रू. १०.०० लाख इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी मारुती कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून मारुती सियाज (पेट्रोल) नविन वाहन शासन मर्यादेनुसार खरेदी करणे योग्य होईल सदर वाहन खरेदी करीता सन २०१८-१९ मधील अंदाजपत्रकात **नविन वाहन खरेदी या लेखाशिर्षात १०.०० लाख इतकी तरतूद** करण्यात आलेली आहे. सदर तरतुदी मधुन जेम ई मार्केटिंग पोर्टल यांचे मार्फत थेट वाहन खरेदी करणेस मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल
ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६५, **बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नळजोडणी मंजूर करणेसाठी धोरण ठरविणेबाबत. (मा. स्थायी समिती दि. १६/०८/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ४५)**

**मा. सभापती :-**

हा विषय प्रलंबित ठेवून पुढच्या मिटींगला घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६६, **श्री. दादासाहेब खेत्रे, विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग यांच्या अपिलीय अर्जावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. स्थायी समिती दि. १६/०८/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५१)**

**मा. सभापती :-**

खेत्रे साहेब तुमचे काय म्हणणे आहे ते मांडा.

**दादासाहेब खेत्रे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो सर मी विभाग प्रमुख म्हणून महापालिकेमध्ये कार्यरत होतो मी फक्त ४ महिने विभाग प्रमुख होतो. माझ्यावर २००९ च्या जी.आर प्रमाणे दोषारोप ठेवले आहेत. सदरचे दोषारोप हे वॉर्ड ऑफिसरला लागू होतात. मला लागू होत नाही असे माझे म्हणणे होते. मी जे चौकशी पूर्वी जे महापालिकेला निवेदन दिलेले होते. त्या निवेदनाचा विचार केला गेला नाही. माझी चौकशी झाली त्यात मला दोषी ठरवण्यात आले. माझ्या कोणत्याही निवेदनाचा विचार केला गेला नाही. म्हणून मी मा. स्थायी समितीकडे अपिल केला आहे. माझ्यावर अन्याय झाला अशी माझी भावना आहे. मा. स्थायी समितीमार्फत माझ्यावर झालेला अन्याय दूर होईल असे मला वाटते म्हणून मी अपिल केले आहे. म्हणून माझी विनंती आहे की मी महापालिकेची ३० वर्ष केलेली सेवा आणि प्रामाणिक केलेले काम म्हणून माझ्या म्हणण्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन मा. सदस्यांना विनंती आहे की ह्या शिक्षेमुळे माझ्या निवृत्ती वेतनावर मी केलेल्या ३० वर्षाच्या सेवेवर खूपच परिणाम होणार आहे तर मी केलेल्या सेवेचा विचार करुन मा. सदस्य महोदयांनी मला ह्याच्यातून मोकळीक द्यावी अशी विनंती.

**प्रशांत दळवी :-**

**श्री. दादासाहेब खेत्रे यांना अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियं त्रण विभाग येथे विभागप्रमुख या पदावर कार्यरत असताना अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणे निष्कासित करण्याची जबाबदारी पार न पाडल्याने जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./1864/2016, दि.06/02/2016 रोजीच्या आदेशान्वये त्यांना निलंबीत करण्यात आले होते.**

**सदर निलंबन प्रकरणाची विभागीय चौक शी करुन, चौकशी अहवालावर मा .आयुक्त यांनी अंतिम निर्णय देऊन खालीलप्रमाणे शिक्षा फर्मावण्यात आलेली आहे :-**

**1) श्री. दादासाहेब खेत्रे, विभागप्रमुख (निलंबीत) हे विभागीय चौकशीत दोषी ठरत असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 5 (1) (चार) नुसार पुढील दोन वार्षिक वेतनवाढी भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होईल , अशा रीतीने रोखणेची शिक्षा फर्मावण्यात आलेली आहे.**

**2) श्री. दादासाहेब खेत्रे यांना निलंबन कालावधीत महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, निलंबन इ. काळातील प्रदाने) नियम 1981 मधील नियम 68 (1) (अ) (एक) नुसार व वित्त विभाग शासन निर्णय क्र .डीआरएस 1081/सीआर-877/एसईआर-8, दि.10 डिसेंबर 1981 नुसार निलंबन दिनांकापासून म्हणजेच दि.06/02/2016 पासून 03 महिन्यांच्या कालावधीनंतर देय असलेला 75%**

**निर्वाह भत्ता अदा करण्यात आलेला आहे . विभागीय चौकशीत ते दोषी आढळून येत असल्याने निलंबन कालावधीतील उर्वरित 25% निर्वाह भत्ता त्यांना अदा करण्यात येणार नाही.**

**3) श्री. दादासाहेब खेत्रे, विभागप्रमुख (निलंबीत) यांचा निलंबन कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 43 नुसार सेवानिवृत्तीच्या प्रयोजनासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.**

**महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम १८ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ५६ अन्वये श्री. दादासाहेब खेत्रे यांनी अपील दाखल केले आहे . त्यांच्यावर लादण्यात आलेल्या शिक्षेमुळे आर्थिक नुकसान तसेच सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या सर्व लाभांवर परिणाम होणार आहे.**

**त्यामुळे अ.क्र.01 अन्वये लादण्यात आलेल्या शास्ती ऐवजी श्री . दादासाहेब खेत्रे यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 5 (1) (चार) नुसार पुढील एक वार्षिक वेतनवाढी भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम न होता, वेतनवाढ रोखणेची शिक्षा देण्यात यावी.**

**आणि श्री. दादासाहेब खेत्रे यांच्या निलंबन कालावधीतील उर्वरित 25% निर्वाह भत्ता त्यांना अदा करण्यात यावा. तसेच सेवानिवृत्तीच्या प्रयोजनासाठी निलंबन कालावधी सेवा कालावधी म्हणुन ग्राहय धरण्यास ही सभा मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिप्ती भट :-**

मा. सभापती साहेब ह्यांचा जसा ठराव आणला तसा सर्वांचाच आणा.

**मा. सभापती :-**

त्यांनी आपल्याकडे अपिल अर्ज केला. आपण प्रशासनाकडून आणि आपल्या ॲक्टमध्ये जे आहे त्याप्रमाणे आपण कारवाई केली त्याप्रमाणे ठराव मांडला आहे. त्यावर पुन्हा प्रशासन कारवाई करेल. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ६६ :-**

**श्री. दादासाहेब खेत्रे, विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग यांच्या अपिलीय अर्जावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. स्थायी समिती दि. १६/०८/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५१)**

**ठराव क्र. ५८ :-**

**श्री. दादासाहेब खेत्रे यांना अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग येथे विभागप्रमुख या पदावर कार्यरत असताना अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणे निष्कासित करण्याची जबाबदारी पार न पाडल्याने जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./1864/2016, दि.06/02/2016 रोजीच्या आदेशान्वये त्यांना निलंबीत करण्यात आले होते.**

**सदर निलंबन प्रकरणाची विभागीय चौकशी करुन , चौकशी अहवालावर मा .आयुक्त यांनी अंतिम निर्णय देऊन खालीलप्रमाणे शिक्षा फर्मावण्यात आलेली आहे :-**

**1) श्री. दादासाहेब खेत्रे, विभागप्रमुख (निलंबीत) हे विभागीय चौकशीत दोषी ठरत असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 5 (1) (चार) नुसार पुढील दोन वार्षिक वेतनवाढी भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होईल, अशा रीतीने रोखणेची शिक्षा फर्मावण्यात आलेली आहे.**

**2) श्री. दादासाहेब खेत्रे यांना निलंबन कालावधीत महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, निलंबन इ. काळातील प्रदाने) नियम 1981 मधील नियम 68 (1) (अ) (एक) नुसार व वित्त विभाग शासन निर्णय क्र .डीआरएस 1081/सीआर-877/एसईआर-8, दि.10 डिसेंबर 1981 नुसार निलंबन दिनांकापासून म्हणजेच दि.06/02/2016 पासून 03 महिन्यांच्या कालावधीनंतर देय असलेला 75% निर्वाह भत्ता अदा करण्यात आलेला आहे . विभागीय चौकशीत ते दोषी आढळून येत असल्याने निलंबन कालावधीतील उर्वरित 25% निर्वाह भत्ता त्यांना अदा करण्यात येणार नाही.**

**3) श्री. दादासाहेब खेत्रे, विभागप्रमुख (निलंबीत) यांचा निलंबन कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 43 नुसार सेवानिवृत्तीच्या प्रयोजनासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.**

**महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम १८ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ५६ अन्वये श्री. दादासाहेब खेत्रे यांनी अपील दाखल केले आहे . त्यांच्यावर लादण्यात आलेल्या शिक्षेमुळे आर्थिक नुकसान तसेच सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या सर्व लाभांवर परिणाम होणार आहे.**

**त्यामुळे अ.क्र.01 अन्वये लादण्यात आलेल्या शास्ती ऐवजी श्री . दादासाहेब खेत्रे यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 5 (1) (चार) नुसार पुढील एक वार्षिक वेतनवाढी भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम न होता, वेतनवाढ रोखणेची शिक्षा देण्यात यावी.**

**आणि श्री. दादासाहेब खेत्रे यांच्या निलंबन कालावधीतील उर्वरित 25% निर्वाह भत्ता त्यांना अदा करण्यात यावा. तसेच सेवानिवृत्तीच्या प्रयोजनासाठी निलंबन कालावधी सेवा कालावधी म्हणुन ग्राहय धरण्यास ही सभा मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६७, **श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांच्या अपिलीय अर्जावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. स्थायी समिती दि. १६/०८/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५२)**

**मा. सभापती :-**

सचिनजी तुमचे काय म्हणणे आहे.

**सचिन पवार :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो मी माझे निवेदन दिले आहे की मागील डिसेंबर २०१७ मध्ये एम.बी. लिहिताना जो पेन वापरला त्यामुळे निलंबन केले होते. ही चूक मी जाणूनबुजून केली नाही किंवा माझा कोणताही हेतू नाही. मी आर्थिक नुकसान केलेले नाही. हा माझ्यावर झालेला अन्याय आहे. ह्यासाठी मी सभागृहाला विनंती केली आहे की माझ्यावर जो अन्याय झाला आहे त्याचा मला न्याय मिळावा अशी माझी विनंती आहे.

**अनिता पाटील :-**

मा. सभापती साहेब ह्यांच्या विषयामध्ये असे लिहिले आहे की जो त्यांनी पेन वापरला तो पेन इतर अधिकारी ही वापरतात. मग एकालाच शिक्षेस पात्र केले आणि बाकी अधिकाऱ्यांना तुम्ही का सोडता.

**सुरेश खंडेलवाल :-**

म्हणून आम्ही हे करतो. **श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग या पदावर कार्यरत असताना मोजमाप पुस्तीकीत पुसल्या जाणाऱ्या शाईने नोंदी केल्याबाबत निदर्शनास आल्याने जा.क्र.मनपा/सा.प्र./ 1551/2016, दि.17/12/2016 रोजीच्या आदेशान्वये त्यांना निलंबीत करण्यात आले होते.**

**सदर प्रकरणात चौकशी अधिकारी यांनी नियम 1981 मधील नियम 72(5) नुसार त्यांचा निलंबन कालावधीतील वेतन संपूर्ण न देता 80% देण्यात यावे. मात्र नियम 68 खाली श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांना देण्यात आलेल्या निर्वाह भत्त्याची रक्कम समायोजित करुन उर्वरित रक्कम दे णे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 47 (सी) नुसार निलंबनानंतर सेवेत पुन :स्थापित केल्यावर त्यांच्या निलंबनाधीन कालावधी सेवेतील खंड समजण्यात येऊ नये, अशी शिक्षा सुचविलेली होती.**

**तथापी, शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी सदर प्रकरणात श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांची महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम 1979 मधील नियम 5 (1) ( चार) नुसार एक वार्षिक वेतनवाढ रोखून**

**ठेवण्याची शिक्षा फर्माविण्यात येत आहे. सदर शिक्षेचा पुढील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही. तसचे श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांनी सार्वजनिक बांधकाम विभागातील नियमांची माहिती असूनही भंग केला असल्याने वरील शिक्षा देण्यात येत आहे. तसेच त्यांना निलंबन कालावधी हा सेवा काळ म्हणून गणला जाणार नाही . अशी शिक्षा देऊन जा .क्र.मनपा/सा.प्र./557/2017, दि.04/10/2017 रोजीच्या आदेशान्वये महा नगरपालिका सेवेत पुन:स्थापित केले आहे .** महाराष्ट्र नागरी सेवा (शिसत व अपील) नियम १९७९ मधील नियम १८ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ५६ अन्वये **अपील दाखल केले आहे . सदर प्रकरणात शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी दिलेली शिक्षा ही गंभीर असून , त्यामुळे कर्मचाऱ्याचे आर्थिक नुकसान तसेच सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या सर्व लाभांवर परिणाम होणार आहे.**

**वरील प्रकरणी श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांना नियम 1979 मधील नियम 5 नुसार रु 5000/- इतक्या रकमेचा दंड देऊन व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 47 (1) (सी) नुसार निलंबनानंतर सेवेत पुन:स्थापित केल्यावर त्यांचा निलंबनाधीन कालावधी सेवेतील खंड समजण्यात येऊ नये , असा ठराव मांडत आहे.**

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ६७ :-**

**श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांच्या अपिलीय अर्जावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे . (मा. स्थायी समिती दि. १६/०८/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५२)**

ठराव क्र. ५९ :-

**श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग या पदावर कार्यरत असताना मोजमाप पुस्तीकीत पुसल्या जाणाऱ्या शाईने नोंदी केल्याबाबत निदर्शनास आल्याने जा .क्र.मनपा/सा.प्र./ 1551/2016, दि.17/12/2016 रोजीच्या आदेशान्वये त्यांना निलंबीत करण्यात आले होते.**

**सदर प्रकरणात चौकशी अधिकारी यांनी नियम 1981 मधील नियम 72(5) नुसार त्यांचा निलंबन कालावधीतील वेतन संपूर्ण न देता 80% देण्यात यावे. मात्र नियम 68 खाली श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांना देण्यात आलेल्या निर्वाह भत्त्याची रक्कम समायोजित करुन उर्वरित रक्कम देणे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 47 (सी) नुसार निलंबनानंतर सेवेत पुन :स्थापित केल्यावर त्यांच्या निलंबनाधीन कालावधी सेवेतील खंड समजण्यात येऊ नये, अशी शिक्षा सुचविलेली होती.**

**तथापी, शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी सदर प्रकरणात श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांची महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 5 (1) (चार) नुसार एक वार्षिक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शिक्षा फर्माविण्यात येत आहे. सदर शिक्षेचा पुढील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही. तसचे श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांनी सार्वजनिक बांधकाम विभागातील नि यमांची माहिती असूनही भंग केला असल्याने वरील शिक्षा देण्यात येत आहे. तसेच त्यांना निलंबन कालावधी हा सेवा काळ म्हणून गणला जाणार नाही . अशी शिक्षा देऊन जा .क्र.मनपा/सा.प्र./557/2017, दि.04/10/2017 रोजीच्या आदेशान्वये महानगरपालिका सेवेत पुन:स्थापित केले आहे .** महाराष्ट्र नागरी सेवा (शिसत व अपील) नियम १९७९ मधील नियम १८ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ५६ अन्वये **अपील दाखल केले आहे . सदर प्रकरणात शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी दिलेली शिक्षा ही गंभीर असून , त्यामुळे कर्मचाऱ्याचे आर्थिक नुकसान तसेच सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या सर्व लाभांवर परिणाम होणार आहे.**

**वरील प्रकरणी श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांना नियम 1979 मधील नियम 5 नुसार रु 5000/- इतक्या रकमेचा दंड देऊन व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 47 (1) (सी) नुसार निलंबनानंतर सेवेत पुन:स्थापित केल्यावर त्यांचा निलंबनाधीन कालावधी सेवेतील खंड समजण्यात येऊ नये , असा ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६८, **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम २० पोटकलम (४) अन्वये मा. स्थायी समितीचे निम्मे (आठ) सदस्य चिठ्ठया टाकुन निवृत्त करणेबाबत .** ह्याची कार्यवाही सुरुवात करतो. प्रथम चिठ्ठी सर्व सदस्यांना दाखवून त्याच्यावरचे नाव वाचणार आहे. मग त्या पेपरच्या घड्या करुन त्या बरणीमध्ये ठेवणार. सर्व चिठ्ठया बरणीत टाकल्यावर ती बरणी व्यवस्थित हलवून चिठ्या व्यवस्थित सरमिसळ होईल ह्याची काळजी घेतली जाईल. त्यानंतर स्थायी समिती सभापती किंवा सदस्य ठरवतील त्या व्यक्तीला सभागृहात बोलवून त्यांच्या हस्ते चिठ्ठी काढण्याची कार्यवाही करु या. सर्वांची नाव पुकारण्यात आली. जी चिठ्ठी काढण्यात येईल ते सदस्य निवृत्त झाले असे समजण्यात येणार. १. श्रीम. दिप्ती शेखर भट २. श्री. हसमुख गेहलोत ३. श्रीम. वंदना विकास पाटील ४. श्रीम. मेघना रावल ५. श्री. धृवकिशोर पाटील ६. श्री. अनिल विराणी ७. श्री. अशोक तिवारी ८. श्रीम. अनिता पाटील. सदरचे सदस्य १ ऑक्टोबरपर्यंत ह्यांची मुदत राहणार आहे. त्यानंतर ते निवृत्त होतील.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६९, **विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**प्रशांत दळवी :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

**१) प्रभाग समिती क्र.०१ व ०२ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.**

**(अंदाजित रक्कम रु. १,५०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| **१) मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा २.५०% जास्त दराने<br>वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने** |
| २) मे. गणेश डेव्हलोपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ६.००% जास्त दराने |

**२) प्रभाग समिती क्र.०३ व ०४ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.**

**(अंदाजित रक्कम रु. १,५०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| **१) मे. गणेश डेव्हलोपर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ४.५०% जास्त दराने<br>वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने** |
| २) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ५.९९% जास्त दराने |

**३) प्रभाग समिती क्र.०५ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.**

**(अंदाजित रक्कम रु. १,५०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| **१) मे. गणेश डेव्हलोपर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ४.५०% जास्त दराने<br>वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने** |

| | |
|---|---|
| २) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ६.२५% जास्त दराने |

**४) प्रभाग समिती क्र.०६ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.**

**(अंदाजित रक्कम रू. १,५०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) **मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा २.३०% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने** |
| २) मे. गणेश डेव्हलोपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ६.००% जास्त दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व ४ च्या कामांकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** व अ.क्र. २ व ३ च्या कामांकरीता **मे. गणेश डेव्हलोपर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ६९ :-**

**विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**ठराव क्र. ६० :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

**१) प्रभाग समिती क्र.०१ व ०२ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.**

**(अंदाजित रक्कम रू. १,५०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) **मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा २.५०% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने** |
| २) मे. गणेश डेव्हलोपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ६.००% जास्त दराने |

**२) प्रभाग समिती क्र.०३ व ०४ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.**

**(अंदाजित रक्कम रू. १,५०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) **मे. गणेश डेव्हलोपर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ४.५०% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने** |
| २) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ५.९९% जास्त दराने |

**३) प्रभाग समिती क्र.०५ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.**

**(अंदाजित रक्कम रू. १,५०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) **मे. गणेश डेव्हलोपर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ४.५०% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने** |
| २) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ६.२५% जास्त दराने |

**४) प्रभाग समिती क्र.०६ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.**

(**अंदाजित रक्कम** रू. १,५०,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) **मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा २.३०% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने** |
| २) मे. गणेश डेव्हलोपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ६.००% जास्त दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व ४ च्या कामांकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** व अ.क्र. २ व ३ च्या कामांकरीता **मे. गणेश डेव्हलोपर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २ के मिरा भाईंदर महानगरपालिका शांतीनगर येथील प्रभाग क्र. ३६ (भागशः), प्रभाग क्र. ३७ (पूर्ण), प्रभाग क्र. ३८ (भागशः) मध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे. (श्री. अटलबिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना) कामाच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.

**सुरेश खंडेलवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शांतीनगर येथील प्रभाग क्र. ३६ (भागशः), प्रभाग क्र. ३७ (पूर्ण), प्रभाग क्र. ३८ (भागशः) मध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे (श्री. अटल बिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना) कामी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत ऑनलाईन निविदा, दोन मुदतवाढी व फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदेमध्ये मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल सोल्यूशन्स इंडीया प्रा. लि. तांत्रिकदृष्ट्या पात्र झाल्याने त्यांचा दराचा लिफाफा उघडण्यात आला. प्राप्त दरांमध्ये दि. २१/०५/२०१८ रोजी वाटाघाटी करून खालील प्रमाणे दर निविदा काराने सादर केले आहेत.

**Financial Bid**

| Sr. No. | Description | Qty | Make & Model | Rate per Unit | Rates After Negotiation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 3MP 30 meter IP BASED IR BULLET OUTDOOR CAMERA & ACCESSORIES as per tender specifications. | 80 | CP Plus (CP UNC-TA30L5S-V2) | 6965 | 6965 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 3MP 50 meter IP BASED IR BULLET OUTDOOR CAMERA & ACCESSORIES as per tender specifications. | 45 | CP Plus (CP UNC-TB30FL6S-M-V2) | 9758 | 9758 |
| 3 | 1KM 5.8GHz wireless bridge outdoor type IP66 | 30 | Ubiquiti (M5-400) | 12151 | 12151 |
| 4 | Video Management Software with license for 150 cameras recording, viewing and playback capability as per tender specifications. | 1 | CP Plus (vOptimus Pro) | 487900 | 487900 |
| 5 | Network Video Server with keyboard, mouse, monitor, HDD storage hardware & required software, with its accessories as per tender specifications. | 1 | HP/ Dell | 1757696 | 1748000 |
| 6 | Client Work Station for Viewing with its accessories as per tender specifications. | 1 | HP/ Dell | 398250 | 397000 |
| 7 | Storage device having capacity to store 30 days recording of 150 cameras each of 3MP resolution at 25FPS | 1 | Synology / Netgear | 1959500 | 1957500 |
| 8 | 65" LED PROFESSIONAL SERIES HD MONITOR as per tender specifications. | 1 | Micromax / LG / Sony / Samsung | 137440 | 137440 |
| 9 | 24+4 PORT ETHERNET POE SWITCH with its accessories as per tender specifications. | 1 | Hi Focus / Dlink / Cisco | 38732 | 31000 |
| 10 | 8 port Giga PoE switch | 30 | Hi Focus | 7569 | 7569 |
| 11 | CAT 6e ETHERNET cable with necessary PVC Conduits, fixtures & junction box as required as per tender specifications. Supply of conduit, fixtures and junction boxes are in cope of vendor. | 3000 | Dlink | 215 | 215 |
| 12 | POLES FOR MOUNTING THE CAMERAS with its accessories as per tender specifications. | 80 | ISI Make | 7372 | 7372 |
| 13 | Outdoor weatherproof junction boxes pole mounted with MCB, POE injector, cameras power supply or POE source and surge protectors required for wireless antennas | 30 | ISI Make | 8762 | 8762 |
| 14 | Lightening arrestors on poles for protection | 80 | ISI Make | 4482 | 4482 |
| 15 | 21UX600MM WX800MM D RACK for Viewing Station with its accessories wheel etc. as per tender specifications. | 1 | ISI Make | 36046 | 36046 |
| 16 | Installation, Testing & Commissioning of the system. Laying & Termination of Power And Data Cables etc. | 1 | NA | 796500 | 792500 |
| 17 | Sector Antenna 5G, Gain 47dbi, or as per actual site requirement | 6 | Ubiquiti (AM-5G19DBI) | 23895 | 23895 |

**Final Total**

| Sr. No. | Particulars | Total Amount | Total After Negotiation |
|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका शांतीनगर येथील प्रभाग क्र . ३६ (भागशः), प्रभाग क्र. ३७ (पूर्ण), प्रभाग क्र. ३८ (भागशः) मध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे (श्री. अटल बिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना) | ९१,९९,५२४/- | ९१,७२,८४२/- |

**B. AMC for Adarsh Ward at MBMC**

| Sr. No. | Particulars | Total Amount in Figure (Rs.) | Rates After Negotiation |
|---|---|---|---|
| 1. | Comprehensive Maintenance for Second Year (On Purchase Cost) | Rs. 919952/- | Rs. 917184/- |
| 2. | Comprehensive Maintenance for Third Year (On Purchase Cost) | Rs. 1379928/- | Rs. 1375776/- |
| Grand total in Figures (T) | | **Rs. 22998800/-** | **Rs. 2292960/-** |

वरील कामाकरीता "भारतरत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना" अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षात मा. महासभेने प्रस्ताव मंजूर केलेला होता. तथापि प्रत्यक्षात निविदा प्रक्रिया होऊन खर्च २०१७-१८ मध्ये झाला नाही. सदर लेखाशिर्षामध्ये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात फक्त रू. १० लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सन २०१८-१९ यावर्षाच्या अर्थसंकल्पातील बांधकाम विभागासाठी ठेवलेल्या "विकास कामांसाठी पुनर्विनियोजन" या लेखाशिर्षातील रू. ७०० लक्ष पैकी उपरोक्त कामासाठी रू. ९२ लक्ष इतका निधी पुनर्विनियोजन करणेस व उपरोक्त दरांस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ७० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शांतीनगर येथील प्रभाग क्र. ३६ (भागशः), प्रभाग क्र. ३७ (पूर्ण), प्रभाग क्र. ३८ (भागशः) मध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे. (श्री. अटलबिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना) कामाच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. ६१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शांतीनगर येथील प्रभाग क्र. ३६ (भागशः), प्रभाग क्र. ३७ (पूर्ण), प्रभाग क्र. ३८ (भागशः) मध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे (श्री. अटल बिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना) कामी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत ऑनलाईन निविदा, दोन मुदतवाढी व फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदेमध्ये मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल सोल्यूशन्स इंडीया प्रा. लि. तांत्रिकदृष्ट्या पात्र झाल्याने त्यांचा दराचा लिफाफा उघडण्यात आला. प्राप्त दरांमध्ये दि. २१/०५/२०१८ रोजी वाटाघाटी करून खालील प्रमाणे दर निविदा काराने सादर केले आहेत.

**Financial Bid**

| Sr. No. | Description | Qty | Make & Model | Rate per Unit | Rates After Negotiation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 3MP 30 meter IP BASED IR BULLET OUTDOOR CAMERA & ACCESSORIES as per tender specifications. | 80 | CP Plus (CP UNC-TA30L5S-V2) | 6965 | 6965 |
| 2 | 3MP 50 meter IP BASED IR BULLET OUTDOOR CAMERA & ACCESSORIES as per tender specifications. | 45 | CP Plus (CP UNC-TB30FL6S-M-V2) | 9758 | 9758 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 1KM 5.8GHz wireless bridge outdoor type IP66 | 30 | Ubiquiti (M5-400) | 12151 | 12151 |
| 4 | Video Management Software with license for 150 cameras recording, viewing and playback capability as per tender specifications. | 1 | CP Plus (vOptimus Pro) | 487900 | 487900 |
| 5 | Network Video Server with keyboard, mouse, monitor, HDD storage hardware & required software, with its accessories as per tender specifications. | 1 | HP/ Dell | 1757696 | 1748000 |
| 6 | Client Work Station for Viewing with its accessories as per tender specifications. | 1 | HP/ Dell | 398250 | 397000 |
| 7 | Storage device having capacity to store 30 days recording of 150 cameras each of 3MP resolution at 25FPS | 1 | Synology / Netgear | 1959500 | 1957500 |
| 8 | 65" LED PROFESSIONAL SERIES HD MONITOR as per tender specifications. | 1 | Micromax / LG / Sony / Samsung | 137440 | 137440 |
| 9 | 24+4 PORT ETHERNET POE SWITCH with its accessories as per tender specifications. | 1 | Hi Focus / Dlink / Cisco | 38732 | 31000 |
| 10 | 8 port Giga PoE switch | 30 | Hi Focus | 7569 | 7569 |
| 11 | CAT 6e ETHERNET cable with necessary PVC Conduits, fixtures & junction box as required as per tender specifications. Supply of conduit, fixtures and junction boxes are in cope of vendor. | 3000 | Dlink | 215 | 215 |
| 12 | POLES FOR MOUNTING THE CAMERAS with its accessories as per tender specifications. | 80 | ISI Make | 7372 | 7372 |
| 13 | Outdoor weatherproof junction boxes pole mounted with MCB, POE injector, cameras power supply or POE source and surge protectors required for wireless antennas | 30 | ISI Make | 8762 | 8762 |
| 14 | Lightening arrestors on poles for protection | 80 | ISI Make | 4482 | 4482 |
| 15 | 21UX600MM WX800MM D RACK for Viewing Station with its accessories wheel etc. as per tender specifications. | 1 | ISI Make | 36046 | 36046 |
| 16 | Installation, Testing & Commissioning of the system. Laying & Termination of Power And Data Cables etc. | 1 | NA | 796500 | 792500 |
| 17 | Sector Antenna 5G, Gain 47dbi, or as per actual site requirement | 6 | Ubiquiti (AM-5G19DBI) | 23895 | 23895 |

**Final Total**

| Sr. No. | Particulars | Total Amount | Total After Negotiation |
|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका शांतीनगर येथील प्रभाग क्र . ३६ (भागशः), प्रभाग क्र. ३७ (पूर्ण), प्रभाग क्र. ३८ (भागशः) मध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे (श्री. अटल बिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना) | ९१,९९,५२४/- | ९१,७२,८४२/- |

**B. AMC for Adarsh Ward at MBMC**

| Sr. No. | Particulars | Total Amount in Figure (Rs.) | Rates After Negotiation |
|---|---|---|---|
| 1. | Comprehensive Maintenance for Second Year (On Purchase Cost) | Rs. 919952/- | Rs. 917184/- |
| 2. | Comprehensive Maintenance for Third Year (On Purchase Cost) | Rs. 1379928/- | Rs. 1375776/- |
| **Grand total in Figures (T)** | | **Rs. 22998800/-** | **Rs. 2292960/-** |

वरील कामाकरीता "भारतरत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना" अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षात मा. महासभेने प्रस्ताव मंजूर केलेला होता. तथापि प्रत्यक्षात निविदा प्रक्रिया होऊन खर्च २०१७-१८ मध्ये झाला नाही. सदर लेखाशिर्षामध्ये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात फक्त रू. १० लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सन २०१८-१९ यावर्षाच्या अर्थसंकल्पातील बांधकाम विभागासाठी ठेवलेल्या "विकास कामांसाठी पुर्नविनियोजन" या लेखाशिर्षातील रू. ७०० लक्ष पैकी उपरोक्त कामासाठी रू. ९२ लक्ष इतका निधी पुर्नविनियोजन करणेस व उपरोक्त दरांस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी हे खूप मोठे प्रभावी वक्ते होते, चांगले कवी होते, एक कुशल संघटक पण होते. एक मोठे राष्ट्रनेता पण होते. त्यांच वक्तृत्व संघर्षित होते. प्रगल्भ होते आणि एक परिपक्व नेते होते. सर्व गुणसंपन्न अशी त्यांची ख्याती होती. म्हणजे एक व्यक्ती अनेक गुण असे ते होते. प्रत्येक माणसाला ते हवेहवेसे होते. कोणत्याही राजकीय पक्षामध्ये त्याचे मित्र होते. एकही राजकीय पक्ष नाही जिथे त्यांचे मित्र नाहीत. सगळ्या राजकीय पक्षांना वाटायचे ते आपल्या जवळचे आणि आपलेच आहेत. ते भारतीय जनता पक्षाचे विरोधी पक्षेनेते असताना सुध्दा ज्यावेळी कॉंग्रेसचे मनमोहन सिंग पंतप्रधान होते त्यावेळी पण त्या दोघांचे संबंध चांगले होते. विरोधाला विरोध करणे आणि चांगल्या कामाला फेवर करणे अशी अटलबिहारींची वृत्ती होती. २००५ ला अटल बिहारींची ॲम्बेसिडर कार खराब झाली होती त्यावेळी मनमोहन सिंग पंतप्रधान होते तेव्हा त्यांनी त्यांची बी.एम.डब्ल्यू दिली म्हणजे एवढे त्यांचे चांगले संबंध होते. पंडित नेहरु जेव्हा पंतप्रधान होते तेव्हा अटलबिहारी वाजपेयीजी भारतीय जनता पक्षाचे खासदार होते. ज्यावेळी परदेशी धोरणावर जे भाषण होते ते तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु ह्यांना खूप आवडायचे. पंडित नेहरु साहेबांनी सांगितले की ही व्यक्ती एक दिवशी देशाच सर्वोच्च स्थान प्रदान करेल असे त्यावेळी नेहरुजींनी भाकित केले होते ते भाकीत खर झाल की अटलबिहारी वाजपेयीजी तीन वेळा पंतप्रधान झाले आणि बिगर कॉंग्रेसचे पाच वर्ष पूर्ण करणारे एकमेव पंतप्रधान होते. बाकी बिगर कॉंग्रेसी पंतप्रधान होते. ते पाच वर्षांचे टर्म पूर्ण करु शकले नाही. परंतु अटलबिहारी वाजपेयी साहेबांनी पाच वर्षांचे टर्म पूर्ण केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघ, भारतीय जनता पार्टी ह्या अशा विचारधारांच्या चौकटी पलिकडे जाऊन त्यांनी स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले होते. कधी कधी ते आपल्या कार्यकर्त्यांना पण रागवायचे की तुम्ही जे करता ते चुकीचे करता. असे व्हायला नाही पाहिजे. आपले एक स्थान आहे आपण चांगले काहीतरी करु शकतो. अशाप्रकारे कार्यकर्त्यांना दाबायचे त्यांना बोलायचे. कॉंग्रेसचे नरसिंह राव जेव्हा पंतप्रधान होते तेव्हा त्यांनी अटलबिहारी वाजपेयीना पद्मविभूषण पदवी देऊन सन्मानित केले. कारण तशा प्रकारचे त्यांचे वर्तन होते. त्यांचे सभागृहात तसे संभाषण होते. त्याप्रमाणे आपली जबाबदारी पूर्णपणे पार पाडली होती. अडवाणीजी आणि अटलबिहारीजी ह्यांनी भारतीय जनता पार्टीसाठी जे योगदान दिले ते आज तुम्ही पाहता आहेत. आज संपूर्ण हिंदुस्थानमध्ये भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे. २० ते २२ राज्यामध्ये आपल्या भारतीय जनता पक्षाचे मुख्यमंत्री आहेत. अनेक महानगरपालिकांमध्ये आपली सत्ता आहे. ही देन अटल बिहारी साहेबांची आहे. दोघांची दोस्ती होती दोघांनी भाजतीय जनता पक्ष वाढवण्यासाठी खूप काम केले. अडवाणीजी एक कट्टर

हिंदुत्ववादी होते आणि वाजपेयी एक सौम्य आणि उदार व्यक्तिमत्व होते म्हणजे परस्पर विरोधी वागणूक होती. परंतु त्या दोघांची दोस्ती चांगली होती. त्यामुळे भारतीय जनता पार्टी एवढी मोठी झाली. त्याचं एक वाक्य होत की मेरे प्रभू मुझे उतनी ऊंचाई कभी मत देना की अपने को गले न लगा सकू। कधी कधी माणस एवढी मोठी होतात बट नॅचरल त्याची काम वाढतात कामाच्या ओझ्यामध्ये दबला जातो की तो आपल्या माणसाला भेटू पण शकत नाही असे त्यांचे उच्च विचार होते. सगळ्या पक्षाचे घनिष्ठ मित्र पण होते आणि त्यांच्या कारकिर्दीत सगळ्यात एक मोठे चांगले काम केले की अणुचाचणीचे अनुचाचणी केली म्हणजे अनुचाचणीचे जे स्फोट होतात ना पोखरणचे तशा पाच अणुचाचण्या केल्या, म्हणजेच एवढी जबरदस्त डेरिंग अजुनपर्यंत अशा कोणत्याही पंतप्रधानांनी केली नाही. अशा कोणत्याही सरकारने के जी नाही अशी त्यांनी केलेली आहे. आणि आज त्याच्यामुळेच अमेरिक सुध्दा घाबरली म्हणजे अमेरिकेने आपल्या भारतावरती अनेक प्रकारचे निर्बंध लादले. म्हणजेच अमेरिकेने लादल्यानंतर रशिया आहे, इंग्लंड आहे या लोकांनी पण निर्बंध लादले. तरीसुध्दा ते न डगमगता अटलबिहारीजींनी आणि त्यांच्या टिमनी चांगली आपली इकोनॉमिकली व्यवस्था अशी मजबुत ठेवली. जेणेकरुन एवढे आर्थिक निर्बंध आपल्या इंडियाला काहीही फरक पडला नाही. जबरदस्त एक त्यांचे असे ध्येय होते आणि त्याच्यानंतर सर्व राष्ट्रांना आपले आर्थिक निर्बंध परत घ्यायला लागले. दुसरी त्यांची अशी एक होती की पाकिस्तानबरोबर जे संबंध खराब झालेले होते तरी ते सुधारण्यासाठी सुध्दा त्यांनी भरपूर मेहनत केली. आपली लाहोरची बससेवा सुरु केली. त्यांचे नाव होते सदा एल सरहद्द एवढी चांगली त्यांनी संकल्पना राबविली. आणि दोन्ही देशांचे संबंध सुधारण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि त्या बसमध्ये त्यांनी प्रवास करुन त्या शिखर परिषद त्यांनी ती अटेंड केली. जी पाकिस्तानमध्ये शिखर परिषद होती ती त्यांनी अटेंड केली. म्हणजे एवढे त्यांनी संबंध सुधारण्याकरिता पाऊल उचलले होते. त्याच्यानंतर त्यांनी कारगिल युध्द. कारगिल युध्दामध्ये त्यांची जी धैर्यवान वृत्ती होती जबरदस्त त्यांनी कारगिल युध्दामध्ये आपल्या जवानांना सपोर्ट केला. त्यांच्या मागे ते उभे राहिले आणि लढाई करण्याकरिता त्यांनी सपोर्ट केला. त्याच्यामुळे आपल्या सैनिकांनी ते कारगिल युध्द जिंकले. त्याच्यानंतर दिल्ली, कलकत्ता, मुंबई, चेन्नई अशी जी ४ महत्वाची शहर आहेत. ह्या शहराला जोडण्यासाठी त्यांनी सुवर्ण चतुष्कोन नावाची महत्वाची योजना पण राबवली. आता जर तुम्ही बघितल तर चांगले रस्ते झालेले आहेत. त्याच्यानंतर १०० वर्षापेक्षा जुना असा कावेरी प्रश्न आपल्या हिंदुस्थानचा. तो पण त्यांनी सोडवली असे अनेक कार्य त्यांनी आपल्या पंतप्रधानाच्या कारकिर्दीमध्ये केलं. काकोडकर नावाचे जे शास्त्रज्ञ आहेत जे अणुचाचणीमध्ये त्यांनी महत्वाचा वाटा घेतला होता. ज्यावेळी १३ दिवसांचे सरकार होते. त्या १३ दिवसांच्या सरकारामध्ये पंतप्रधान वाजपेयी साहेबांनी ती सही केली होती. त्याच्यानंतर त्यांच सरकार गेलं. मग काकोडकर साहेब बोलले की वाजपेयीजी तुम्ही तर सही केली पण आता सरकार गेले तर आता काय करणार? मी माझ काम केले आहे आता काम तुमचं आहे. अस सांगितल्यानंतर काकोडकर पण विचारात पडले की सत्ता गेल्यानंतर दुसऱ्या सरकारने अजिबात त्याच्यांवरती कारवाई नाही केली. पुन्हा जेव्हा वाजपेयीजी पंतप्रधान बनले. त्यावेळी इमिजिएटली त्यांनी त्या प्रस्तावावरती सही करुन तो प्रस्ताव मार्गी लावला. अशाप्रकारचे पंतप्रधान मी पहिल्यांदाच बघितले असं अनिल काकोडकर सरांच मत आहे. ते एवढे जबरदस्त, डॅशींग अटल बिहारी वाजपेयी होते. त्यांच निधन झाले. अल्पशः आजाराने आपण त्यांना श्रध्दांजली वाहु या असे मी आपल्या सगळ्यांना विनंती करतो आणि त्याचबरोबर आपले भारताचे पहिले कॅप्टन अजित लक्ष्मण वाडेकर हे सुध्दा त्यांनी क्रिकेटमध्ये चांगले नाव काढले होते. सन १९७१ साली ते भारतीय संघाचे कर्णधार होते. त्याच्यानंतर महाराष्ट्र सरकारने त्यांना १९७२ साली अर्जुन अवार्ड दिला होता आणि त्यांनी पद्मश्री सुध्दा अवार्ड दिला होता आणि त्यांनी पण त्यांच्या कारकिर्दीमध्ये प्रथम श्रेणीमध्ये १५३८० धावा काढल्या, ३६ शतके आणि ८४ अर्धशतके त्यांनी ठोकली आणि त्यांचा हायेस्ट स्कोअर ३२३ आहे आणि एक चांगलं व्यक्तीमत्व होते. मुंबईचे आणि हिंदुस्थानचे क्रिकेटचे महत्व वाढविण्याकरिता खुप चांगली कामगिरी बजावली होती. निवड समितीचे ते अध्यक्ष होते, मॅनेजर पण होते अशी त्यांनी चांगली कारकिर्द पार पाडली तरी त्यांचेही निधन झालेले आहे. त्यांना पण आपण श्रध्दांजली वाहु या. कॉंग्रेस पक्षाचे जे खासदार गुरुदास कामत साहेब माजी केंद्रीय मंत्री व माजी खासदार ही होते तर त्यांचे सुध्दा निधन झालेले आहे. त्यांना पण आपण श्रध्दांजली वाहु या. त्यांच्या आत्म्यास शांती देवो त्यांच्या कुटुंबियांना या दुःखातून सावरण्याची ईश्वराने शक्ती देवो हीच प्रार्थना. तसेच आपल्या मिरारोडचे सुपुत्र शहीद मेजर कौस्तुभ राणे ह्यांनी सुध्दा ७ ते ८ वर्षाच्या कारकिर्दीमध्ये लेफ्टनन्ट पद, कर्नल पद आणि मेजर पदापर्यंत पोहचले आणि एक चांगली कामगिरी केली. आपल्या हिंदुस्थानच्या सिमेवरती लढता लढता त्यांना वीरमरण आलेले आहे आणि तस त्यांनी महाराष्ट्राचे व मिरा भाईंदरचे नाव गाजवलेले आहे. त्यांना पण आपण श्रध्दांजली वाहूया.

**प्रशांत दळवी :-**

मराठी चित्रपट सृष्टीतले अभिनेता विजय चव्हाण त्यांना ही श्रध्दांजली वाहु या.

**दुःखवठा ठराव क्र. ६२ :-**

भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांचे निधन झालेले आहे. त्याचबरोबर आपले भारताचे पहिले कॅप्टन अजित लक्ष्मण वाडेकर यांचेसुध्दा दुःखद निधन झालेले आहे. तसेच काँग्रेस पक्षाचे खासदार गुरुदास कामत साहेब माजी केंद्रीय मंत्री व माजी खासदार ही होते तर त्यांचे सुध्दा निधन झालेले आहे. तसेच आपल्या मिरारोडचे सुपुत्र शहीद मेजर कौस्तुभ राणे ह्यांनी सुध्दा ७ ते ८ वर्षाच्या कारकिर्दीमध्ये लेफ्टनन्ट पद, कर्नल पद आणि मेजर पदापर्यंत पोहचले आणि एक चांगली कामगिरी केली. आपल्या हिंदुस्थानच्या सिमेवरती लढता लढता त्यांना वीरमरण आलेले आहे. तसेच मराठी चित्रपट सृष्टीतले अभिनेता विजय चव्हाण यांचेसुध्दा निधन झालेले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी जागेवर शांत उभं राहायचं आहे.

**(सभा संपण्याची वेळ दु. १२.३० वाजता)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

